मराठी

# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# ‘एक हात मदतीचा’ विसरलो नाही; म्हणून महेशदादांसोबत..!

## सातारा, सांगली, कोल्हापूरकर मैदानात : विधानसभा निवडणुकीत निर्णायक भूमिका

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर या भागातून शहरात स्थायिक झालेल्या नागरिकांची संख्या मोठी आहे. या नागरिकांचे मतदान हे दरवेळी निर्णायक भूमिका बजावत असते. गेली दोन टर्म आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असलेले सातारा, सांगली आणि कोल्हापूरकरवासी आमदार महेश लांडगे यांच्या पाठीशी यंदाही ठामपणे उभे आहेत. आमचे निर्णायक मतदान आम्ही आमदार महेश लांडगे यांच्या पारड्यात टाकून त्यांची हॅट्रिक निश्चित करणार आहे. कारण, २०१९ मध्ये उद्धवलेली महापूर परिस्थिती आणि महेश लांडगे यांचा ‘एक हात मदतीचा’ उपक्रम आम्ही विसरलो नाही, असा निर्धार मेळाव्यात व्यक्त करण्यात आला.




भोसरी विधानसभा मतदारसंघातील भाजपा महायुतीचे उमेदवार आमदार महेश लांडगे यांच्या समर्थनासाठी सीजन बँक्वेट हॉल यमुनानगर येथे निर्धार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला सातारा, सांगली कोल्हापूरवासियांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. या मेळाव्याचे आयोजन राष्ट्रवादीच्या माजी महापौर व भोसरीच्या समन्वयक मंगला कदम यांनी केले.

मेळाव्यामध्ये आमदार महेश लांडगे यांच्या कामाचा लेखाजोखा सातारा, सांगली, कोल्हापूरच्या नागरिकांनी मांडला. भोसरी मतदारसंघात आमदार महेश लांडगे हे कुटुंबप्रमुखा प्रमाणे आपली भूमिका बजावत आहेत. गेली दहा वर्ष या मतदारसंघाला परिपूर्ण शाश्वत विकासाच्या कल्पनेतून पुढे नेण्याचे काम आमदार महेश लांडगे यांनी केली असल्याच्या भावना नागरिकांनी व्यक्त केल्या. पश्चिम महाराष्ट्रातील महापुराच्या आठवणी जाग्या झाल्या.

तसेच, छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा, इंजिनियरिंग कॉलेज, न्यायालय संकुल, पोलीस आयुक्तालय, मोशीतील हॉस्पिटल, संतपीठ, संविधान भवन अशा एक ना अनेक गोष्टी आमदार महेश लांडगे यांनी साकारल्या आहेत. सर्वात महत्त्वाचे म्हणजे प्रत्येक समाजाच्या पाठीशी उभे राहण्याची त्यांची वृत्ती त्यांचे काम अधोरेखित करते. त्यांच्याकडे गेलेल्या प्रत्येक व्यक्तीला त्यांच्याबद्दल आश्वस्त वाटते. त्यांच्या माध्यमातून येथे कायद्याची जरब निर्माण झाली आहे .ज्यामुळे आमच्या महिला भगिनींना सुरक्षित वातावरण मिळाले आहे, अशा प्रतिक्रियाही सांगली-सातारा-कोल्हापूरकरांनी दिल्या आहेत.

“ आमदार महेश लांडगे यांच्या बद्दल नागरिकांनी व्यक्त केलेल्या भावना हीच त्यांच्या कामाची पोचपावती आहे. यमुनानगर, कृष्णानगर, संभाजीनगर भागामध्ये त्यांनी आमदार निधीमधून मंदिर, समाज भवन यांसारखी कामे करून दिली आहेत. त्यामुळे समाजाची त्यांच्या प्रति आस्था आहे. हीच कामे त्यांच्यासाठी विजयाची हॅट्रिक मिळवून देतील असा विश्वास आहे.

- मंगला कदम, माजी महापौर पिंपरी-चिंचवड.

“ कोणत्याही समाजाप्रती उदात्त भावना ठेवून त्यांचा आदर करणे हीच भाजपा आणि महायुतीची कार्यशैली आहे. देव-देश-धर्म, समाज त्यानंतर आपण हे धोरण केवळ बोलण्यापुरते न ठेवता अंगीकारण्याचा प्रयत्न गेल्या १० वर्षांत केलेला आहे. पिंपरी-चिंचवडच्या प्रगतीशील वाटचालीमध्ये देशाच्या कानाकोपऱ्यातून वास्तव्यास आलेल्या सर्व जाती-धर्माच्या नागरिकांचे योगदान आहे. भूमिपुत्रांच्या त्यागातून आणि कामगार-कष्टकऱ्यांच्या घामातून हे शहर उभे राहिले. ‘शेवटच्या घटकाचा विकास’ आणि तळागाळातील नागरिकांना सर्वोतोपरी मदतीचा हात, हीच माझी भावना राहीली आहे.

- महेश लांडगे, आमदार भोसरी विधानसभा, उमेदवार महायुती.

---

# सकाळ-सायंकाळ मेजवानी! निवडणुकीमुळे अडगळीतील कार्यकर्त्यांना ‘अच्छे दिन’

## छोट्या-मोठ्या प्रचारसभा, फेऱ्यांमध्ये गर्दी दिसावी यासाठी कार्यकर्त्यांचा ‘भाव’ वाढला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध राजकीय पक्षांच्या वारेमाप घोषणांनी सर्वसामान्य जनतेला ‘अच्छे दिन’ आले अथवा नाही हे मतदार निवडणुकीमध्ये मतदान करुन दाखवून देणार आहेत. मात्र, तत्पूर्वी प्रचारात चांगलीच चुरस पाहायला मिळत असल्याने अडगळीत पडलेले कार्यकर्ते आणि भाडेतत्वावर कामास घेतलेल्या लोकांना ‘अच्छे दिन’ आल्याचे दिसून आले आहे. छोट्या-मोठ्या प्रचारसभा, फेऱ्यांमध्ये गर्दी दिसावी यासाठी त्यांचा ‘भाव’ वाढला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांसह स्टार प्रचारकही प्रचाराच्या कामाला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीने आपापल्या बंडखोरांना शमविण्याचा प्रयत्न केला.

मात्र, अनेकजण निवडणुकीच्या रिंगणात आहेत. ( उर्वरित पान २ वर)



### उमेदवारांच्या कचेऱ्यांवर रेलचेल

» उमेदवारांच्या कचेऱ्यांवर कार्यकर्त्यांची मोठी रेलचेल दिसून येत आहे. एरवी अडगळीत पडलेले कार्यकर्ते हे उमेदवाराला महत्वाचे वाटू लागले आहेत. अन्य निवडणुकांच्या मानाने ही निवडणूक काही वेगळीच पाहायला मिळत आहे. मोठ्या प्रमाणात दिवसाआड स्टार प्रचारांच्या मोठ्या सभा होत असल्याने गर्दी दिसण्यासाठी कार्यकर्त्यांना भाव आला आहे. प्रचार फेरीमध्येही मतदारसंघात आता विकास होईल, असे आश्वासन उमेदवारांकडून मतदारांना मिळू लागले आहे. अशावेळी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी उमेदवारांच्या अवतीभवती असल्याचे दिसून येत आहे.

### सकाळ-सायंकाळ मेजवानी

» सध्या विधानसभेच्या निवडणुका रंगात आहेत. शहरातील तीनही विधानसभा मतदारसंघांत प्रचंड चुरशीने प्रचार यंत्रणा राबवली जाऊ लागली आहे. काही मतदारसंघात तिरंगी, दुरंगी लढत होणार असल्याने प्रचारसभा, फेरी, पदयात्रा, बैठकांसाठी कार्यकर्ते व स्थानिक पुढारी सक्रीय झाले आहेत. लोकसभा निवडणुकीनंतर सर्वच राजकीय पक्षांचे आजी-माजी नेते निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. मतदानासाठी अवघे आठ दिवस उरले असल्याने महायुती, महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या छोट्या-मोठ्या सभेसाठी कार्यकर्ते जोमाने काम करत आहेत. त्यासाठी राजकीय पक्षांच्या उमेदवारांना कार्यकर्त्यांसाठी सकाळपासून सायंकाळपर्यंत सर्व व्यवस्था करून मेजवानी द्यावी लागत आहे.

“ आम्ही मजुरीचे काम करतो. कधी काम मिळते; तर कधी मिळत नाही. मात्र, निवडणुका म्हटले की आमच्यासाठी दिवाळी असते. कुठल्याही निवडणुकीत आम्हाला प्रचारासाठी बोलावले जाते. सभा, प्रचार फेरीमध्ये सहभागी होण्यासाठी चार ते पाच तासांचे पाचशे ते सहाशे रुपये दिले जातात. त्याबरोबरच नाश्ता आणि जेवणही दिले जाते. रोजची रोजंदारी म्हणून प्रचाराचे काम करतो.

- सुशांत परदेशी, लालटोपी नगर.

# 'भाऊ' आणि 'भाई' यांची हात मिळवणी, हे न सुटलेले कोडे : सूर्यकांत वाघमारे

## रिपब्लिकन पक्षाच्या मेळाव्यात शेळके यांच्या विक्रमी मताधिक्याचा निर्धार

**पुणे | प्रतिनिधी**

मावळातून 2009 मध्ये 'भाऊ' विरुद्ध 'भाई' अशी लढत झाली होती. यावेळी भाई आणि भाऊ यांची हात मिळवणी कशी झाली, हे एक न सुटलेले कोडे आहे, अशी टिप्पणी रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) प्रदेश सचिव सूर्यकांत वाघमारे यांनी आज (गुरुवारी) केली.




मावळ विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस- भाजप- शिवसेना- आरपीआय- एसआरपी महायुतीचे उमेदवार आमदार सुनील शेळके यांच्या प्रचारार्थ कामशेत येथे रिपब्लिकन पक्ष आठवले गटाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. त्यात ते बोलत होते.

मेळाव्यास ज्येष्ठ नेते माऊली दाभाडे, मावळ पंचायत समितीचे माजी सभापती विठ्ठलराव शिंदे, भाजपचे तळेगाव शहराध्यक्ष संतोष दाभाडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे जिल्हा संघटक संजय बावीस्कर, कुलस्वामिनी महिला मंचच्या प्रमुख सारिका सुनील शेळके, आरपीआयचे तालुकाध्यक्ष नारायण भालेराव, आरपीआय युवक तालुकाध्यक्ष अंकुश सोनवणे, पुणे जिल्हा संघटक अतुल सोनवणे, पुणे जिल्हा सरचिटणीस गणेश गायकवाड, मावळ तालुका कार्याध्यक्ष अशोक सदावर्ते, लोणावळा शहर अध्यक्ष कमलशील म्हस्के, देहूरोड शहराध्यक्ष अरविंद गायकवाड, तळेगाव शहराध्यक्ष संदीप शिंदे, पश्चिम महाराष्ट्र सरचिटणीस यमुना साळवे, पुणे जिल्हा अध्यक्ष मालनताई बनसोडे, मावळ तालुका अध्यक्ष भावना ओव्हाळ तसेच सर्व विभागीय अध्यक्ष, महिला आघाडीच्या पदाधिकारी तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मेळाव्याला महिला कार्यकर्त्यांची उपस्थिती लक्षणीय होती.

सूर्यकांत वाघमारे म्हणाले की, 2019 मध्ये भाऊच्या बाजूने आम्ही भाईच्या विरोधात लढलो होतो. आता तेच भाऊ भाईंना पुढे करून निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. एवढे परिवर्तन कसे झाले, हा एक न सुटणारा प्रश्न आहे.

गेली पंधरा वर्षे रिपब्लिकन पक्ष आठवले गट महायुतीचा घटक पक्ष म्हणून काम करीत आहे. पण आमच्या पक्षाला आणि पक्षातील कार्यकर्त्यांना खरा न्याय गेल्या अडीच वर्षात मिळाला आहे, असे वाघमारे यांनी सांगितले.

महायुतीत भाजपकडे आम्ही मित्रपक्ष म्हणून अनेकदा न्याय मागितला, पण आम्हाला तो कधीच मिळाला नाही. अजित पवार यांचा राष्ट्रवादी पक्ष महायुतीत सहभागी झाल्यानंतर अजितदादांनी आम्हाला खूप मदत केली व न्याय मिळवून दिला, असे वाघमारे म्हणाले.

आमदार सुनील शेळके यांनी तालुक्यात आंबेडकरी जनतेसाठी गेल्या पाच वर्षात खूप काही केले आहे. तालुक्यातील बौद्धकालीन लेण्यांचे संवर्धन, तळेगाव येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकाचा विकास, देहूरोड येथील ऐतिहासिक बुद्धविहाराचा विकास यात शेळके यांनी मोठे योगदान दिले. आदिवासी व मागासवर्गीय समाजाच्या विकासासाठी शेळके यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. आंबेडकरी जनतेला सर्वाधिक विकास निधी शेळके यांच्यामुळेच उपलब्ध झाला, अशी माहिती वाघमारे यांनी दिली. सर्व समाजांना बरोबर घेऊन पुढे वाटचाल करणाऱ्या आमदार शेळके यांना पुन्हा विक्रमी मताधिक्याने विधानसभेत पाठवण्यासाठी रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते जीवाची बाजी लावतील, अशी ग्वाही वाघमारे यांनी यावेळी दिली.

सुनील शेळके तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है', 'महायुतीचा विजय असो', 'रिपब्लिकन पक्षाचा विजय असो' अशा कार्यकर्त्यांच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.



# हडपसर मतदारसंघात 147 मतदान केंद्रे स्थलांतरित

## नवीन केंद्रावर जाऊन मतदान करण्याचे आवाहन

**पुणे | प्रतिनिधी**

मतदारांच्या सोयीच्या दृष्टीने हडपसर विधानसभा मतदारसंघातील १४७ मतदान केंद्रे स्थलांतरित करण्यात आली आहेत. त्याबाबत जुन्या मतदान केंद्राच्या ठिकाणी सूचना फलक लावण्यात आले आहेत. मतदारांनी हा बदल लक्षात घेऊन स्थलांतरित नवीन ठिकाणच्या केंद्रावर मतदान करण्याचे आवाहन, हडपसर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. स्वप्नील मोरे यांनी केले आहे.




हडपसर विधानसभा मतदार संघात एकूण ५३२ मतदान केंद्रे आहेत. मतदारांच्या सोयीसाठी निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार सुसुत्रीकरणांतर्गत खुल्या जागेतील तात्पुरत्या पत्राशेडमध्ये असलेली १४७ केंद्रे शंभर ते पाचशे मीटर अंतरावरील पक्क्या इमारतीमध्ये स्थलांतरित करण्यात आली आहेत.

बदल झालेल्या मतदान केंद्राचा तपशील 'VOTER HELPLINE APP' आणि 'HTTPS://ELECTROALSEARCH.ECI.GOV.IN' या साईटवर 'KNOW YOUR POLLING STATION' यामध्ये पाहता येईल तसेच सोबत दिलेला किंवा आर कोड मोबाईलद्वारे स्कॅन करून ठिकाणात बदल झालेल्या मतदान केंद्राचा सविस्तर तपशील उपलब्ध करून घेता येईल. तेव्हा मतदारांनी या सुविधांचा वापर करून मतदारांच्या सोयीच्या दृष्टीने हडपसर विधानसभा मतदारसंघातील १४७ मतदान केंद्रे स्थलांतरित करण्यात आली आहेत. स्थलांतरित नवीन ठिकाणी असलेल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे, असे निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. मोरे यांनी सांगितले.

# सकाळ-सायंकाळ मेजवानी! निवडणुकीमुळे अडगळीतील कार्यकर्त्यांना 'अच्छे दिन'

**पिंपरी | प्रतिनिधी**

( पान १ वरून )

त्यामुळे, प्रचारातही चांगलीच चुरस बघायला मिळत आहे. त्या पार्श्वभूमीवर, आपापल्या पक्षाची ताकद दाखविण्यासाठी मतदारसंघांमध्ये प्रचार सभांचे आयोजन केले जात आहे. परिणामी, निवडणुकीच्या धामधुमीत अडगळीतील कार्यकर्त्यांना चांगले दिवस पाहायला मिळत आहेत.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला आता वेग आला आहे. प्रत्येक पक्षाच्या नेत्यांसह स्टार प्रचारकही प्रचाराच्या कामाला लागले आहेत. महायुती आणि महाविकास आघाडीने आपापल्या बंडखोरांना शमविण्याचा प्रयत्न केला. मात्र, अनेकजण निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

त्यामुळे, प्रचारातही चांगलीच चुरस बघायला मिळत आहे. त्या पार्श्वभूमीवर, आपापल्या पक्षाची ताकद दाखविण्यासाठी मतदारसंघांमध्ये प्रचार सभांचे आयोजन केले जात आहे. परिणामी, निवडणुकीच्या धामधुमीत अडगळीतील कार्यकर्त्यांना चांगले दिवस पाहायला मिळत आहेत.

### पक्षाच्या प्रतिमेची काळजी

» पक्षाच्या मोठ्या नेत्यांच्या सभेमध्ये गर्दी असणे उमेदवाराला अपेक्षित असते. सोशल मीडियाच्या माध्यमातून अनेकदा सभेमध्ये खुर्च्या रिकाम्या असल्यावरून टीका केली जाते. त्यामुळे, पक्षाची प्रतिमा टिकवून ठेवण्यासाठी उमेदवाराला अनेकदा नागरिकांना पैसे देऊन गर्दी जमवावी लागते; तर अनेक जणांनी पाहुण्यांकडे राबता सुरू केल्याचे चित्र आहे. अन्य उमेदवारांपेक्षा आम्हीच सरस आहोत, हे दाखवण्यासाठी सध्या चढाओढ सुरू आहे.

### घराघरांत पत्रके वाटप

» घरोघरी पत्रके वाटणे, प्रचार फेरीत झेंडे व उमेदवारांची छायाचित्र असलेले फलक फडकाविण्याचे काम कार्यकर्ते करत आहेत. घरोघरी मतदारयाद्या घेऊन मतदारांच्या नावांचा शोध कार्यकर्ते घेत आहे. उमेदवारांनी कार्यकर्त्यांना टोप्यांचे वाटप केले आहे.

> प्रचारफेरी अथवा सभेतील गर्दी मोठी दिसावी म्हणून प्रत्येक राजकीय पक्षाचा उमेदवार प्रयत्न करत आहे. त्यासाठी चक्क पैसे देऊन कार्यकर्ते बोलावतात. दिवसभर मोलमजुरी करून जेवढा पैसा मिळत नाही; तेवढे पैसे काही तासांच्या प्रचार फेरीमध्ये मिळत आहे.
>
> - विकास गायकवाड, भोसरी.

# 'लाडक्या बहिणी'कडून शंकर जगतापांचे जोरदार स्वागत

## महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांच्या समर्थनार्थ रहाटणीतील ग्रामस्थांची 'वज्रमुठ'!



**पिंपरी | प्रतिनिधी**

स्व. आमदार लक्ष्मणभाऊ जगताप आणि आमदार अश्विनीताई जगताप यांच्या माध्यमातून रहाटणी गावचा चेहरामोहरा बदलला. त्यांच्या आमदार निधीतून रहाटणी गावाचा जो अविश्वसनीय विकास झाला आहे, त्यामुळे आम्हाला रहाटणीकर म्हणवून घेताना अभिमान वाटतो. त्यांनी केलेल्या याच विकासकामांची पावती म्हणून आम्ही सर्व रहाटणीतील नागरिक एकजुटीने आणि एकमताने शंकर जगताप यांना मताधिक्य देऊन विधानसभेत पाठवणार; असा संकल्प रहाटणी ग्रामस्थांनी केला आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातील भाजप - शिवसेना - राष्ट्रवादी काँग्रेस - रिपाइं (आठवले) मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार शंकर जगताप यांचा रहाटणी गावात झंझावाती प्रचार दौरा पार पडला. या दौऱ्यात रहाटणी परिसरात भव्य पदयात्रा काढून जगताप यांनी रहाटणीकरांना अभिवादन करून त्यांच्याशी संवाद साधला. रहाटणी गावचे ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ मंदिरात नारळ वाढवून पदयात्रेला प्रारंभ करण्यात आला. त्यानंतर जगताप यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर शंकर जगताप यांनी रहाटणीतील रामनगर, गोडांबे चौक, नखाते वस्ती, वर्धमान अंगण, क्रिस्टल ज्ञानगंगा सोसायटी, बसवेश्वर चौक, तमारा सोसायटी, रोज लँड सोसायटी, रहाटणी फाटा, एस.एन.बी.पी स्कूल रोड, नखाते वस्ती, शास्त्रीनगर, रायगड कॉलनी, हॉटेल कुणाल सह शिवतीर्थ नगर, शास्त्री नगर या परिसरात जोरदार शक्ती प्रदर्शन करत पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेस नागरिकांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. हलगीच्या तालात जागोजागी पुष्पवृष्टी करून नागरिकांनी जगताप यांचे जोरदार स्वागत केले.

या पदयात्रेत मावळ लोकसभेचे खासदार श्रीरंग बारणे, राष्ट्रवादीचे राष्ट्रीय विद्यार्थी अध्यक्ष सनी मानकर, माजी नगरसेवक नाना काटे, माजी नगरसेवक शत्रुघ्न काटे, शिवसेनेचे शहराध्यक्ष निलेश तरस, माजी नगरसेवक चंद्रकांत नखाते, माजी नगरसेवक बाबा त्रिभुवन, माजी नगरसेविका सविता खुळे, गोपाळ माळेकर, माजी नगरसेवक कैलास थोपटे, स्विकृत सदस्य संदीप नखाते, नरेश खुळे, अरुण चाबुकस्वार, गणेश नखाते, संदीप काटे, देविदास तांबे, राकेश नखाते, बाळासाहेब नखाते, सुनील कुंजीर, सागर कोकणे, विजय कांबळे, संजय भोसले, दीपक जाधव, निलेश नखाते, बाबू तांबे, रवी मसतूद, शिवसेनेचे प्रदीप दळवी, अंकुश कोळेकर, माधव मनोरे, काळूराम कवितके, संतोष जगताप, नामदेव शिंत्रे, बाळासाहेब काळे, दत्ता दाखले, विनोद चौधरी, विनोद नखाते, कांतीलाल शेलार, शामराव गोडांबे, पोपट कापसे, सागर खेडेकर, विठ्ठल नखाते, संतोष नखाते, सुजाता नखाते, पै. किशोर नखाते, काळूराम थोपटे, सोमनाथ कापसे, अरुण तांबे, कपिल कुंजीर, कुणाल लांडगे, आदित्य काटे, केतन काटे, भांदास काटे, आनंद देवकर, अजय कदम, काळूराम नढे, सुभाष दराडे, नितीन काळे, कैलास परभाने, अक्षय बाराते, सुवर्णा राक्षे, अनिल नखाते, निलेश नखाते, मनोज नखाते, महेश नायकोडे, विशाल माळी, ऋषिकेश नखाते, श्रीकृष्ण भोरे, शशिकांत जाधव, दादासाहेब पाटील, बाळा माने, रणजीत घुमरे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक आणि महिला वर्ग यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### चिंचवडमध्ये पुन्हा कमळच फुलविणार; 'लाडक्या बहिणी'चा निर्धार

**» या पदयात्रेत रहाटणीतील महिला वर्गाचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला. जागोजागी एकत्रित येऊन महिलांनी शंकर जगताप यांचे औक्षण केले. तसेच 'लाडकी बहीण योजना' सुरू केल्याबद्दल महायुती सरकारचे कौतुक केले. व ही योजना अशीच सुरू राहावी यासाठी राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार आणायचे आहे. आणि त्यासाठी "चिंचवडमध्ये आम्ही कमळच फुलविणार" असा शब्दच या लाडक्या बहिणींनी शंकर जगताप यांना दिला.**

> रहाटणीत स्व. लक्ष्मणभाऊ आणि अश्विनीताई यांच्या आमदार निधीतून विविध सोसायट्यांमध्ये व रस्त्यालगत सौर ऊर्जेचे दिवे, विविध ठिकाणी दगडी पारचे बांधकाम, मनपाच्या मोकळ्या जागेत ज्येष्ठ नागरिकांसाठी चावडी, विविध सोसायट्यांमध्ये व अंतर्गत गल्ल्यांमध्ये पेव्हिंग ब्लॉक, प्रभागात 5 इंची, 8 इंची आणि 10 इंची ड्रेनेज लाईन, ज्येष्ठ नागरिकांना बसण्यासाठी ठिकठिकाणी लोखंडी बेंचेस, विविध सोसायट्यांमध्ये पाण्यासाठी बोअरवेल, अंतर्गत रस्त्यांचे डांबरीकरण अशी कोट्यावधी रुपयांची विकासकामे करण्यात आली आहेत. पुढील काळातही रहाटणीतील नागरिकांच्या सेवेसाठी मी सदैव तत्पर असेल.
>
> **- शंकर जगताप, महायुतीचे उमेदवार.**

# आकुर्डीमध्ये सुलक्षणा शिलवंत यांच्या पदयात्रेला लोटला जनसागर

## राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) शिवसेना (ठाकरे गट), काँग्रेस व घटक पक्षाचे जोरदार शक्ती प्रदर्शन



**पिंपरी | प्रतिनिधी**

राम कृष्ण हरी, वाजवा तुतारी या जयघोषात आकुर्डी परिसरातील महाविकास आघाडीतील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या अधिकृत उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत धर यांच्या प्रचारासाठी जनसागर लोटला होता. या प्रचंड जनसागरामुळे पिंपरी विधानसभा मतदारसंघाची निवडणूक ही जवळपास एकतर्फी होणार व महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ. सुलक्षणा शिलवंत प्रचंड बहुमताने विजयी होणार याच्यावर शिक्कामोर्तब झाला आहे.

पिंपरी विधानसभा निवडणूक निमित्ताने आकुर्डी दत्तवाडी, विठ्ठलवाडी, क्रांतीनगर, श्रीकृष्ण नगर, एकतानागर, पंचारानगर, गुरुदेवनगर, आकुर्डी गावठाण या भागात महाविकास आघाडीच्या उमेदवार सुलक्षणा शिलवंत धर यांनी प्रचारात आघाडी घेतल्याचे चित्र आज पाहायला मिळाले. सुलक्षणा शिलवंत धर यांच्या प्रचारार्थ आकुर्डी परिसरात गाठीभेटी व भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेला लोटलेली अभुतपुर्व गर्दी पाहता या प्रभागात शिलवंत यांनी जोरदार आघाडी घेतल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.

शिलवंत यांच्या प्रचारार्थ आकुर्डी पहिल्या सत्रात येथे सकाळ पासून गाठीभेटी घेण्यास सुरुवात करण्यात आली. तत्पूर्वी या ठिकाणी गळ्यात राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार पक्षाचे चिन्ह असलेले उपरणे, हातामध्ये तुतारी चिन्ह असलेले फलक, उमेदवारांचे छायाचित्र असलेले फलक घेऊन कार्यकर्ते जोरदार घोषणाबाजी करून वातावरण ढवळून काढत होते. यामध्ये महिला कार्यकर्त्यांची संख्या लक्षणीय होती. ताशाच्या तडतडाटाने या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वारे शिरलेले पाहायला मिळाले. दुपारी १२ वाजता आकुर्डी येथील ऐतिहासिक श्री विठ्ठल मंदिर येथे श्रीफळ वाहून भव्य पद यात्रेला सुरुवात करण्यात आली.

सकाळच्या सत्रात दत्तवाडी, विठ्ठलवाडी, क्रांतीनगर, श्रीकृष्ण नगर,लाल बहादुर शास्त्री नगर, सह्याद्री कॉलनी, साई दर्शन नगर, टेलको कपूर सोसायटी, एकतानागर तर संध्याकाळ च्या सत्रात आकुर्डी गावठाण, पंचतारानगर, गुरुदेव नगर, गंगानागर, या परिसरात जोरदार शक्तिप्रदर्शन करून पद यात्रा काढण्यात आली.

# गद्दारी केली तर लाज वाटण्यासारखं काहीच नाही

## राज्यातील सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनांमध्ये होणार पॅनिक बटन कार्यान्वित

**पुणे | प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी आंबेगावमध्ये उमेदवार देवदत्त निकम यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. यावेळी बोलताना शरद पवार यांनी त्यांचे जुने सहकारी दिलीप वळसे पाटील यांच्यावर हल्लाबोल केला. भाषणादरम्यान, शरद पवार यांनी दिलीप वळसे पाटील यांच्यावर हल्लाबोल करताना त्यांना गद्दार म्हटलं. शरद पवार यांनी केलेल्या टीकेला दिलीप वळसे पाटील यांनी अद्याप प्रत्युत्तर दिलेलं नाही. मात्र त्यांच्या कन्या पूर्वा वळसे पाटील यांनी शरद पवारांच्या टीकेवर भाष्य केलं आहे.

आंबेगाव येथे देवदत्त निकम यांच्या प्रचारसभेत बोलताना शरद पवार यांनी दिलीप वळसे पाटील यांचा गद्दार असा उल्लेख केला. शरद पवारांनी आपल्या जाहीर सभेत गद्दारांना सुट्टी नाही. वळसे पाटील यांनी गद्दारी केली त्यांना पराभूत करा, असे आवाहन केले होते. शरद पवारांच्या या वक्तव्याविषयी दिलीप वळसे पाटील यांनी आपली भूमिका जाहीर केली आहे. १८ नोव्हेंबरच्या सांगता सभेत दिलीप वळसे पाटील हे शरद पवार यांना प्रत्युत्तर देणार आहेत. मात्र त्याआधी पूर्वा वळसे पाटील यांनी याबाबत प्रतिक्रिया दिली आहे. दिलीप वळसेंनी जनतेचं पाणी वाचवून गद्दारी केली असेल तर लाज वाटण्यासारखं काहीच नाही, असं पूर्वा वळसे पाटील यांनी म्हटलं आहे.



"आपल्या हक्काचं पाणी, आमच्या मतदारसंघाचं पाणी, आमच्या तालुक्याचं पाणी, सात लाख जनतेचं पाणी जे पळवून नेतात त्यांच्याशी आपल्या साहेबांनी गद्दारी केली. सात लाख लोकांचा लढा आपले साहेब लढत आहेत त्याचं काय? या गोष्टीचं खंडण झालं का त्या सभेत, आले का समोर व्हिडीओ. हा बोगदा होणार म्हणजे होणारच. सहा महिने पाणी आलं नाही तर काय होईल. एक खराब उन्हाळा आला, एक दिवस पाणी आलं नाही तर जिवाची तळमळ होते, सहा महिने पाणी आलं नाही तर आपण रस्त्यावर येऊ, आपल्या तोंडातील घास काढून दुसऱ्यांच्या तालुक्यात नेत हे लोक दिवाळी करायला निघालेत, काही तर लाज वाटली पाहिजे," असं पूर्वा वळसे पाटील यांनी म्हटलं.

"दातृत्व भाव आपल्यात नाहीये का? २०१८ मध्ये साहेबांनी म्हटलं होतं धरणातील जे अतिरिक्त पाणी आहे ते बोगद्यानं हमखास न्या. ११ मीटरच्या पातळीवर बोगदा करा आणि हमखास न्या. पण त्यांना तळामध्ये १ मीटर पातळीवर बोगदा करुन पाणी त्यांच्या तालुक्यात न्यायचंय, समोरच्या पक्षातील ज्येष्ठ असतील किंवा इतर कोणी असतील कोणी याचं खंडण करत नाहीत. म्हणजे आपली किती जमेची बाजू आहे समजून घ्या. दिलीप वळसेंनी जनतेचं पाणी वाचवून गद्दारी केली असेल तर लाज वाटण्यासारखं काहीचं नाही. काल दूध का दूध, पाणी का पाणी झालं, एका अर्थानं देवाचे आभार मानते, काल घडलं ते खूप चांगलं झालं," असंही पूर्वा वळसे पाटील यांनी म्हटलं.

### शरद पवार काय म्हणाले?

» माझी पत्नी वर्षातून एकदा भीमाशंकरला जाते, आत्ता अलीकडे ही ती भीमाशंकरला आली. मी विचारलं नेहमी सारखी व्यवस्था होती का? त्या म्हणाल्या यावेळी दिलीप वळसेंच्या घरी गेलीच नाही, थेट भीमाशंकर दर्शन घेऊन परतले.आता यांनी बोलायला काय ठेवलं आहे का? त्यांनी एकचं गोष्ट ठेवली, फक्त गद्दारी केली. ज्यांनी गद्दारी केली, त्यांना शिक्षा द्यायची असते. महाराजांसोबत ज्यांनी गद्दारी केली त्यांना कधी सोडलं का? त्यामुळं आपल्यासोबत गद्दारी केली, त्यांना सुट्टी नाही. या गद्दारांचा मोठ्या फरकाने पराभव करा आणि देवदत्त निकमांना आमदार बनवा, असं शरद पवार म्हणाले होते.

# थंडीचा कडाका वाढताच आजारांमध्ये वाढ!

## बदलत्या हवामानाचा परिणाम : शहरात थंडीचा कडाका वाढू लागला

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात थंडीचा कडाका वाढू लागला आहे. हिवाळ्यातील हवा थंड आणि कोरडी असल्याने आपली प्रतिकारशक्ती कमकुवत होते. यामुळे श्वसनविकारांसह विषाणूजन्य आजारांमध्ये वाढ होण्याची शक्यता आरोग्यतज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. यामुळे काळजी घेण्याचा सल्लाही त्यांनी दिला आहे.

हिवाळ्यात दिवस छोटा आणि रात्र मोठी असते. त्यामुळे नागरिकांचा सूर्यप्रकाशात राहण्याचा वेळही कमी होतो. त्यातून शरीरातील ड जीवनसत्वाची पातळी कमी होऊन प्रतिकारशक्ती कमकुवत होते. थंडीच्या काळात नागरिक अधिक काळ घरात थांबत असल्याने जंतूसंसर्ग वेगाने पसरतो. यामुळे फ्ल्यू, सांधेदुखी अशा तक्रारी सुरू होतात. अशा तक्रारी टाळण्यासाठी बदलत्या हवामानानुसार आहार आणि जीवनशैलीत बदल करावा, असे आरोग्यतज्ज्ञांनी म्हटले आहे.



याबाबत ससून सर्वोपचार रुग्णालयातील औषधवैद्यकशास्त्र विभागाचे प्रमुख डॉ. रोहिदास बोरसे म्हणाले की, थंडीत दम्यासह श्वसनविकाराच्या रुग्णांना अधिक त्रास होऊ शकतो. त्यामुळे त्यांनी त्रास सुरू झाल्यास तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. अन्यथा त्रास वाढून गुंतागुंत होण्याचा धोका निर्माण होतो. अचानक तापमान कमी झाल्यामुळे हे वातावरण विषाणूंच्या वाढीला पोषक ठरते. त्यामुळे या कालावधीत विषाणूजन्य आजारांमध्ये वाढ होते. याचबरोबर ताप, सर्दी खोकल्याच्या रुग्णांमध्ये वाढ होते.

### थंडीमुळे शारीरिक तक्रारी

» सर्दी, खोकल्यासह फ्ल्यूचा त्रास
» दमा, ॲलर्जीचा त्रास, श्वसनविकार
» सांधेदुखी, आर्थ्रायटिस
» रक्तवाहिन्यांचे आकुंचन होऊन रक्तदाब वाढणे
» ड जीवनसत्वाची कमतरता

### काळजी काय घ्यावी?

» उबदार कपडे परिधान करावेत.
» थंडीपासून संरक्षण स्वतःचे करावे.
» वातानुकूलन यंत्रांचा वापर टाळा.
» नियमितपणे व्यायम करा.
» शरीराला पुरेसा सूर्यप्रकाश मिळेल याची काळजी घ्या.
» त्रास झाल्यास तातडीने डॉक्टरांना दाखवा.